# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना :-</u>** **"मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४" राबविण्याबाबत.**

**{महसूल विभाग}** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम १२७(१)(अ) च्या तरतूदी अन्वये नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील इमारत व जमिन करीता मालमत्ता कर आकारणी करुन मालमत्ता कर रक्कमेची वसुली करण्यात येत असते. मालमत्ता कर नागपूर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असून मालमत्ता कर द्वारा प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचे उपयोग शहराचे विकास कामात होत असते.

नागपूर महानगरपालिका सभागृहानी आर्थिक वर्ष २०१४-२०१५ चे म.न.पा. चे अंदाजपत्रक मंजुर करतांना व ठराव क्र.७२ दि.०४/०३/२०१५ अन्वये म.न.पा. सीमेतील इमारत व जमिनीकरीता मालमत्ता कर निर्धारण करणेकरीता करयोग्य मुल्य पद्धतीचा वापर करणेचा व मालमत्तेचे करयोग्य मुल्य तर्कसंगत व पारदर्शकरीत्या निश्चित होणेकरीता अवलंबण्याच्या पद्धती करीता म.न.पा. सीमेतील प्रत्येक इमारत व जमिनी करीता ठिकाण, वापर व इमारत असल्यास बांधकामाचा प्रकार व बांधकामाचे वय, बांधकाम क्षेत्रफळ व खुला भुखंड असल्यास भुखंडाचे क्षेत्रफळ, त्या क्षेत्रातील वर्ष २०१३ चा सिद्ध शिघ्र गणक दर विचारात घेवून मासीक भाडे ठरविणेकरीता आवश्यक प्रति माह प्रति चौरस मीटर दर इत्यादी विचारात घेणेचे निश्चित झाले. म.न.पा. सीमेतील इमारत व जमिन करीता आवश्यक सदर डाटा door-to-door भेट देवून GeoCivic App च्या माध्यमातून गोळा करण्यात आला व जी.आय.एस. सर्वेक्षणात मालमत्ता कर निर्धारणातून सुटलेल्या मालमत्ता आढळल्यात व काळानुरुप मालमत्ता मध्ये बदल झाल्याचे सुद्धा निदर्शनास आले.

ठराव क्र.७२ दि.०४/०३/२०१५, ठराव क्र.७३ दि.२०/०७/२०१७ व ठराव क्र.१५८ दि.३०/१२/२०१७ अन्वये घेतलेल्या निर्णय व प्राप्त जी.आय.एस. डाटा चा वापर व मालमत्ता कर निर्धारणातून सुटलेल्या मालमत्ता किंवा मालमत्ता कर निर्धारण कक्षेत प्रथमत:च येत असलेल्या मालमत्ता करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १५०(अ) चा वापर करुन पूर्वलक्षी प्रभावाने करण्यात आलेली मालमत्ता कर निर्धारणमुळे, वर्षानुवर्षे पासुन मालमत्तेमधील बदलानुरुप वेळेच्या वेळी मालमत्ता कर निर्धारण अद्यावत न झाल्यामुळे व एकदम जी.आय.एस. सर्वेक्षणात आढळलेला डाटा नुसार व करयोग्य मुल्य निश्चित करणेच्या नवीन पद्धतीमुळे वार्षिक मालमत्ता कर रक्कमेत वाढ झाली व कृषक जमिनी करीता मालमत्ता कर आकारला जावू शकत नाही असा नागरीकांचा गैरसमज मोडीत काढून कृषक जमिनी मालमत्ता कर निर्धारण कक्षेत कलम १५०(अ) च्या तरतूदी अन्वये पूर्वलक्षी प्रभावाने मालमत्ता कर निर्धारण कक्षेत आणण्यात आल्यात व मालमत्ता कर निर्धारण करण्यात आल्यामुळे मालमत्ता कर रक्कमेत आर्थिक वर्ष २०१६-१७ पासुन भरमसाठ वाढ झाली. त्यामुळे नागरीकांनी वेळेच्या वेळी मालमत्ता कर म.न.पा. निधीत जमा न केल्याने, तसेच आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या पूर्वीच्या वर्षापासून सुद्धा मालमत्ताधारकांकडे मालमत्ता कर रक्कम थकित असल्याने थकित मालमत्ता कर रक्कमेत मोठी वाढ निदर्शनास येते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ट 'ड' प्रकरण-८ चे कराधान नियम ४१ अन्वये चालु आर्थिक वर्षाचे दिलेल्या बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पहिल्या सहा महिन्याची मालमत्ता कराची रक्कम, बिल दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत भरणे आवश्यक आहे आणि बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दुसऱ्या सहा महिन्याची मालमत्ता कराची रक्कम, प्रत्येक आर्थिक वर्षाच्या ३१ डिसेंबरपूर्वी भरणे आवश्यक आहे, आणि जर, मालमत्ता कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्तप्रमाणे आवश्यक असल्याप्रमाणे मालमत्ता कराची रक्कम भरली नाही तर, अशी अदत कराची रक्कम किंवा त्या रक्कमेचा भाग याव्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता, त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम, शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल आणि बिलाची पूर्ण रक्कम देईपर्यंत अशी शास्ती भरण्यास तो जबाबदार असण्याचे चालू राहील अशी तरतूद आहे.

आजस्थितीत उपरोक्तप्रमाणे जे मिळकतदार मालमत्ता कराचा भरणा विहित कालावधीत नागपूर महानगरपालिका निधित करीत नाही, अशा मिळकतीच्या थकीत मालमत्ता करावर २% प्रतिमाह प्रमाणे व्याज/शास्ती लागत असते. त्यानुसार दिनांक ११ डिसेंबर २०२३ पर्यंत ३१०२९८ मालमत्ताधारकांवर

रु.७९०,७४,५१,६९३/- मालमत्ता कर बकाया असून यावर रु.५६५,९२,५०,३२३/- व्याज/शास्ती लागलेली आहे. यामध्ये शासकीय/निमशासकीय मालमत्ता करीता सुद्धा मालमत्ता कर रक्कम थकीत आहे व विवादीत प्रकरणामुळे सुद्धा रक्कम रु. १०४.५९ कोटी थकीत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ट 'ड' प्रकरण-८ चे कराधान नियम ४२ अन्वये मालमत्ता कर भरण्यास पात्र व्यक्तीने या अधिनियमाच्या तरतूदीन्वये आवश्यक असल्याप्रमाणे शास्ती किंवा व्याज अथवा दोन्ही यासह मालमत्ता कर भरला नसेल तर कसूरदाराची जंगम मालमत्ता/स्थावर मालमत्ता अटकावणी किंवा जप्ती करुन याकरीता नियम ५० अन्वये लागू केलेली फी किंवा वसुलीचा खर्च म्हणून आकारण्यात व वसुल करण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे परिशिष्ट 'ड' प्रकरण-८ चे कराधान नियम ४१ अन्वये खालील शास्ती किंवा नियम ५० अन्वये खालील फी किंवा वसुलीचा खर्च हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ट 'ड' प्रकरण-८ चे कराधान नियम क्र.५१ च्या तरतुदीन्वये मा. आयुक्त स्वेच्छानिर्णयानुसार पूर्णत: किंवा अंशत: माफ करु शकतात.

चालू आर्थिक वर्षात सुद्धा बरेच नागरीक व लोकप्रतिनिधी बऱ्याच प्रमाणात थकीत मालमत्ता कर रक्कमेवरील शास्ती माफ करणेबाबत निवेदन सादर करीत आहेत. तसेच महाराष्ट्र विधानमंडळाचे तिसरे अधिवेशन (हिवाळी अधिवेशन २०२३) मध्ये विधानपरिषद सदस्य मा. श्री. प्रविणजी दटके, मा. श्री. चंद्रशेखर बावणकुळे व इतर सदस्य यांनी लक्षवेधी सूचना क्र.४०३ द्वारे देखील पाणी बिल, मालमत्ता कर व महानगरपालिकेच्या दुकानांचे थकीत भाडे या सर्वांवर आकारल्या जात असलेले दंड माफ करण्याबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे परिशिष्ट ‘ड’ प्रकरण ८ चे कराधान नियम ५१ च्या तरतूदी अंतर्गत मा. आयुक्त, म.न.पा. यांना प्रदान असलेल्या स्वेच्छा निर्णय अधिकारांतर्गत नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कर थकबाकीदाराकडून थकीत मालमत्ता कर रक्कम वसुल होण्यास्तव कराधान नियम ५१ च्या तरतूदी अंतर्गत उचित सकारात्मक निर्णय घेवून नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील संपूर्ण मालमत्ता (इमारत व जमिन) वरील थकीत मालमत्ता कराची रक्कम व चालु आर्थिक वर्षापर्यंतची संपूर्ण मालमत्ता कर रक्कम एकमुस्त भरल्यास कराधान नियम ४१ नुसार येणार शास्ती/दंड आणि कराधान नियम ५० अन्वये लागू केलेली फी किंवा वसुलीचा खर्च हा ८०% माफ करण्याबाबत **दिनांक ०१ जानेवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४** पर्यंत **‘मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४’** लागु करण्याचे प्रस्तावित असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**१. ‘मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४’ चा कालावधी :**

‘मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४’ चा कालावधी हा दिनांक ०१ जानेवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ असा राहील.

**२. ‘मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४’ ची व्याप्ती :**

‘मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४’ अंतर्गत **दिनांक ३१ मार्च २०२३ पर्यंत** थकबाकी असणाऱ्या तसेच चालू आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर **दिनांक ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत** नागपूर महानगरपालिका निधीत जमा न केल्याने चालू आर्थिक वर्षाकरीता थकीत झालेल्या करदात्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.

‘मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४’ लागू असलेल्या काळात करदात्यांडून नागपूर महानगरपालिकेस घेणे असलेल्या मुळ रक्कमेचे १००% अधिदान खालीलप्रमाणे केल्यास, थकीत रक्कमेवर कराधान नियम ४१ अन्वये प्रतिमाह २% प्रमाणे आकारण्यात आलेला दंड व नियम ५० खालील जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क किंवा वसुलीचा खर्च खालीलप्रमाणे माफ करण्यात येईल.

| तपशील | कालावधी | माफी |
|---|---|---|
| दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत असलेल्या मालमत्ता कराच्या थकित रक्कमेसह चालू आर्थिक वर्ष २०२३-२४ चा सुद्धा मालमत्ता कर रक्कम नागपूर महानगर पालिका निधीत जमा केल्यास | दि.०१ जानेवारी, २०२४ ते दि.३१ मार्च, २०२४ च्या सायंकाळी ८.०० वाजेपर्यंत | थकित शास्ती रक्कम व दंड/फी ची रक्कम **८० टक्के** माफ |

**३. 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' चा लाभ खालील बाबीसाठी अनुज्ञेय राहील :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे परिशिष्ट 'ड' प्रकरण ८ चे कराधान नियम ४१ खालील शास्ती/दंड किंवा नियम ५० खालील जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क किंवा वसुलीचा खर्च वा नमुद कालमर्यादेनुसार **८०% माफ** करण्यात येईल.

**४. 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' अंतर्गत सवलतीस पात्र असलेल्या रक्कमा :**

सदर योजना ही वर नमूद केलेल्या कालावधीत जमा केलेल्या रक्कमांनाच लागू राहील. या योजनेच्या प्रारंभापूर्वी अथवा समाप्तीनंतर भरणा केलेल्या रकमांना लागू राहणार नाही. योजना सुरु होण्यापूर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत मागणी/दावा करता येणार नाही.

**५. 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' नुसार करावयाचा भरणा आणि अपील मागे घेणे इत्यादी अभय योजनेच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी लागू असणाऱ्या अटी :**

- ज्या कालावधीसाठी सवलतीचा लाभ घ्यावयाचा आहे, त्या कालावधीचे कोणतेही प्रलंबित असलेले अपील पुर्नर्निरीक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, मा.न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहिजे.
- जर अभय योजनेचा लाभ मिळाल्यानंतर अपील, पुर्नर्निरीक्षण आवेदन, संदर्भ आवेदन, मा.न्यायालयात दावा किंवा रिट याचिका दाखल केली तसेच भविष्यात सदर्हू योजनेतील लाभधारक मालमत्ता कर करीता थकबाकीदार आढळल्यास अभय योजने नुसार संबंधीत कालावधीसाठी दिलेल्या सवलती काढून घेण्यात येतील.
- 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' चा लाभधारक भविष्यात मिळकतकर रकमांकरीता थकीतदार राहणार नाही, असा लिखीत कबुली वचननामा संबंधीत लाभधारकांनी लाभ घेतेवळी सादर करणे गरजेचे राहील.

**६. आयुक्तांचे अधिकार प्रदान करणे :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६९ अन्वये आयुक्तांस असलेले अधिकार कलम १२८ व प्रकरण ८ कराधान नियम मधील नियम ५१ नुसार 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' च्या कालावधीपर्यंत (दिनांक ०१ जानेवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४) या कालावधीसाठी उपायुक्त (महसूल), सहाय्यक आयुक्त (कर), सहाय्यक आयुक्त (झोन) यांना प्रदान करण्यात येत आहेत, त्यानंतर ते संपुष्टात येतील.

तसेच सध्यास्थितीत म.न.पा. सीमेतील ४२६ झोपडपट्टी क्षेत्रातील इमारत व जमिनी करीता आदेश क्र.१४३१/TAD दि.०७/१२/२०२३ अन्वये लागू केलेली अभय योजना 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' मध्ये ०१ जानेवारी २०२४ पासुन समाविष्ठ होईल.

**७. कार्यवाही विषयक बाबी :**

- मालमत्ता कर विभागाने 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' राबविण्यासाठी मागणी नोंदवहीत सदर रक्कमा माफ केल्याची नोंद करदात्याने कराचे संपूर्ण रक्कमेचे अधिदान केल्यानंतरच घ्यावी.
- मे.सायबरटेक सिस्टीम ॲन्ड सॉफ्टवेअर प्रा.लि. यांनी 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' राबविण्यासाठी संगणक प्रणालित (GeoCivic Property Tax Management System) योग्य ते बदल तत्काळ करावयाचे असून माफ करण्यात येणारी दंडाची रक्कम ही करदाता ज्या क्षणास कराचा भरणा करेल त्या क्षणास (Real Time) माफी देणेबाबत बदल करावेत व तसे प्रमाणपत्र/दाखला करदात्यास देण्यात यावा.

**८. 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' ची जाहिरात व प्रसिध्दी –**

'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' राबविण्यासाठी नागरीकांकडून मोठया प्रमाणावर प्रतिसाद मिळावा यासाठी सदर योजनेच्या तपशीलाबाबत पुढीलप्रमाणे विविध माध्यमातून प्रसिध्दी देण्यात येईल.

१. इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे तथा वर्तमानपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात यावी.
२. महापालिकेच्या संकेत स्थळावर देखील सदर योजनेचा तपशील देण्यात यावा.
३. सर्व झोन कार्यालयात, वसुली केंद्रावर, उद्यानात 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' चे फलक लावण्यात यावे.

४. महानगरपालिकेच्या परिवहन विभागाच्या प्रत्येक बसेस वर 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' चे फलक लावण्यात यावे.
५. स्थानिक T.V.Channel व्दारा, रेडीओ स्टेशन व्दारा 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' ची प्रसिध्दी देण्यात यावी.
६. प्रत्येक वार्डातील प्रत्येक गल्लीत ऑटो फिरवून ध्वनीक्षेपणाद्वारे 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' ची प्रसिध्दी देण्यात यावी.
७. सर्व झोन कार्यालयाव्दारे त्यांचे झोन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या मालमत्ताधारकांच्या घरी माहितीपत्रके वाटून 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' ची माहिती देण्यात यावी.
८. Bulk SMS System द्वारे नागरीकांना SMS पाठवून 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' ची माहिती देण्यात यावी.
९. महानगरपालिकेच्या Advertising sites वर Hoardings लावून 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' ची प्रसिध्दी देण्यात यावी.
१०. खाजगी Advertising sites करीता खाजगी एजन्सीला विनंती करुन 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' चे Hoardings खाजगी Advertising sites वर लावण्यात यावे.

उपरोक्त प्रमाणे **'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४'**राबविण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 17/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 30/12/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (महसूल), स्थावर विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार **"मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४" राबविण्याबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम १२७(१)(अ) च्या तरतूदी अन्वये नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील इमारत व जमिन करीता मालमत्ता कर आकारणी करुन मालमत्ता कर रक्कमेची वसुली करण्यात येत असते. मालमत्ता कर नागपूर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असून मालमत्ता कर द्वारा प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचे उपयोग शहराचे विकास कामात होत असते.

नागपूर महानगरपालिका सभागृहानी आर्थिक वर्ष २०१४-२०१५ चे म.न.पा. चे अंदाजपत्रक मंजुर करतांना व ठराव क्र.७२ दि.०४/०३/२०१५ अन्वये म.न.पा. सीमेतील इमारत व जमिनीकरीता मालमत्ता कर निर्धारण करणेकरीता करयोग्य मुल्य पद्धतीचा वापर करणेचा व मालमत्तेचे करयोग्य मुल्य तर्कसंगत व पारदर्शकरीत्या निश्चित होणेकरीता अवलंबण्याच्या पद्धती करीता म.न.पा. सीमेतील प्रत्येक इमारत व जमिनी करीता ठिकाण, वापर व इमारत असल्यास बांधकामाचा प्रकार व बांधकामाचे वय, बांधकाम क्षेत्रफळ व खुला भुखंड असल्यास भुखंडाचे क्षेत्रफळ, त्या क्षेत्रातील वर्ष २०१३ चा सिद्ध शिघ्र गणक दर विचारात घेवून मासीक भाडे ठरविणेकरीता आवश्यक प्रति माह प्रति चौरस मीटर दर इत्यादी विचारात घेणेचे निश्चित झाले. म.न.पा. सीमेतील इमारत व जमिन करीता आवश्यक सदर डाटा door-to-door भेट देवून GeoCivic App च्या माध्यमातून गोळा करण्यात आला व जी.आय.एस. सर्वेक्षणात मालमत्ता कर निर्धारणातून सुटलेल्या मालमत्ता आढळल्यात व काळानुरुप मालमत्ता मध्ये बदल झाल्याचे सुद्धा निदर्शनास आले.

ठराव क्र.७२ दि.०४/०३/२०१५, ठराव क्र.७३ दि.२०/०७/२०१७ व ठराव क्र. १५८ दि. ३०/१२/२०१७ अन्वये घेतलेल्या निर्णय व प्राप्त जी.आय.एस. डाटा चा वापर व मालमत्ता कर निर्धारणातून सुटलेल्या मालमत्ता किंवा मालमत्ता कर निर्धारण कक्षेत प्रथमत:च येत असलेल्या मालमत्ता करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १५०(अ) चा वापर करुन पूर्वलक्षी प्रभावाने करण्यात आलेली

मालमत्ता कर निर्धारणमुळे, वर्षानुवर्षे पासुन मालमत्तेमधील बदलानुरुप वेळेच्या वेळी मालमत्ता कर निर्धारण अद्यावत न झाल्यामुळे व एकदम जी.आय.एस. सर्वेक्षणात आढळलेला डाटा नुसार व करयोग्य मुल्य निश्चित करणेच्या नवीन पद्धतीमुळे वार्षिक मालमत्ता कर रक्कमेत वाढ झाली व कृषक जमिनी करीता मालमत्ता कर आकारला जावू शकत नाही असा नागरीकांचा गैरसमज मोडीत काढून कृषक जमिनी मालमत्ता कर निर्धारण कक्षेत कलम १५०(अ) च्या तरतूदी अन्वये पूर्वलक्षी प्रभावाने मालमत्ता कर निर्धारण कक्षेत आणण्यात आल्यात व मालमत्ता कर निर्धारण करण्यात आल्यामुळे मालमत्ता कर रक्कमेत आर्थिक वर्ष २०१६-१७ पासुन भरमसाठ वाढ झाली. त्यामुळे नागरीकांनी वेळेच्या वेळी मालमत्ता कर म.न.पा. निधीत जमा न केल्याने, तसेच आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या पूर्वीच्या वर्षापासून सुद्धा मालमत्ताधारकांकडे मालमत्ता कर रक्कम थकित असल्याने थकित मालमत्ता कर रक्कमेत मोठी वाढ निदर्शनास येते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ट 'ड' प्रकरण-८ चे कराधान नियम ४१ अन्वये चालु आर्थिक वर्षाचे दिलेल्या बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पहिल्या सहा महिन्याची मालमत्ता कराची रक्कम, बिल दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत भरणे आवश्यक आहे आणि बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दुसऱ्या सहा महिन्याची मालमत्ता कराची रक्कम, प्रत्येक आर्थिक वर्षाच्या ३१ डिसेंबरपूर्वी भरणे आवश्यक आहे, आणि जर, मालमत्ता कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्तप्रमाणे आवश्यक असल्याप्रमाणे मालमत्ता कराची रक्कम भरली नाही तर, अशी अदत कराची रक्कम किंवा त्या रक्कमेचा भाग याव्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता, त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम, शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल आणि बिलाची पूर्ण रक्कम देईपर्यंत अशी शास्ती भरण्यास तो जबाबदार असण्याचे चालू राहील अशी तरतूद आहे.

आजस्थितीत उपरोक्तप्रमाणे जे मिळकतदार मालमत्ता कराचा भरणा विहित कालावधीत नागपूर महानगरपालिका निधित करीत नाही, अशा मिळकतीच्या थकीत मालमत्ता करावर २% प्रतिमाह प्रमाणे व्याज/शास्ती लागत असते. त्यानुसार दिनांक ११ डिसेंबर २०२३ पर्यंत ३१०२९८ मालमत्ताधारकांवर रु.७९०,७४,५१,६९३/- मालमत्ता कर बकाया असून यावर रु.५६५,९२,५०,३२३/- व्याज/शास्ती लागलेली आहे. यामध्ये शासकीय/निमशासकीय मालमत्ता करीता सुद्धा मालमत्ता कर रक्कम थकीत आहे व विवादीत प्रकरणामुळे सुद्धा रक्कम रु. १०४.५९ कोटी थकीत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ट 'ड' प्रकरण-८ चे कराधान नियम ४२ अन्वये मालमत्ता कर भरण्यास पात्र व्यक्तीने या अधिनियमाच्या तरतूदीन्वये आवश्यक असल्याप्रमाणे शास्ती किंवा व्याज अथवा दोन्ही यासह मालमत्ता कर भरला नसेल तर कसूरदाराची जंगम मालमत्ता/स्थावर मालमत्ता अटकावणी किंवा जप्ती करुन याकरीता नियम ५० अन्वये लागू केलेली फी किंवा वसुलीचा खर्च म्हणून आकारण्यात व वसुल करण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे परिशिष्ट 'ड' प्रकरण-८ चे कराधान नियम ४१ अन्वये खालील शास्ती किंवा नियम ५० अन्वये खालील फी किंवा वसुलीचा खर्च हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ट 'ड' प्रकरण-८ चे कराधान नियम क्र.५१ च्या तरतुदीन्वये मा. आयुक्त स्वेच्छानिर्णयानुसार पूर्णत: किंवा अंशत: माफ करु शकतात.

चालू आर्थिक वर्षात सुद्धा बरेच नागरीक व लोकप्रतिनिधी बऱ्याच प्रमाणात थकीत मालमत्ता कर रक्कमेवरील शास्ती माफ करणेबाबत निवेदन सादर करीत आहेत. तसेच महाराष्ट्र विधानमंडळाचे तिसरे अधिवेशन (हिवाळी अधिवेशन २०२३) मध्ये विधानपरिषद सदस्य मा. श्री. प्रविणजी दटके, मा. श्री. चंद्रशेखर बावणकुळे व इतर सदस्य यांनी लक्षवेधी सूचना क्र.४०३ द्वारे देखील पाणी बिल, मालमत्ता कर व महानगरपालिकेच्या दुकानांचे थकीत भाडे या सर्वांवर आकारल्या जात असलेले दंड माफ करण्याबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे परिशिष्ट 'ड' प्रकरण ८ चे कराधान नियम ५१ च्या तरतूदी अंतर्गत मा. आयुक्त, म.न.पा. यांना प्रदान असलेल्या स्वेच्छा निर्णय अधिकारांतर्गत नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कर थकबाकीदाराकडून थकीत मालमत्ता कर रक्कम वसुल होण्यास्तव कराधान नियम ५१ च्या तरतूदी अंतर्गत उचित सकारात्मक निर्णय घेवून नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील संपूर्ण मालमत्ता (इमारत व जमिन) वरील थकीत मालमत्ता कराची रक्कम व चालु आर्थिक वर्षापर्यंतची संपूर्ण मालमत्ता कर रक्कम एकमुस्त भरल्यास कराधान नियम ४१ नुसार येणार शास्ती/दंड आणि कराधान नियम ५० अन्वये लागू केलेली फी किंवा वसुलीचा खर्च हा ८०% माफ करण्याबाबत **दिनांक ०१ जानेवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४** पर्यंत **'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४'** लागु करण्याचे प्रस्तावित असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**१. 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' चा कालावधी :**

'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' चा कालावधी हा दिनांक ०१ जानेवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ असा राहील.

**२. 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' ची व्याप्ती :**

'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' अंतर्गत **दिनांक ३१ मार्च २०२३ पर्यंत** थकबाकी असणाऱ्या तसेच चालू आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर **दिनांक ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत** नागपूर महानगरपालिका निधीत जमा न केल्याने चालू आर्थिक वर्षाकरीता थकीत झालेल्या करदात्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.

'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' लागू असलेल्या काळात करदात्यांडून नागपूर महानगरपालिकेस घेणे असलेल्या मुळ रक्कमेचे १००% अधिदान खालीलप्रमाणे केल्यास, थकीत रक्कमेवर कराधान नियम ४१ अन्वये प्रतिमाह २% प्रमाणे आकारण्यात आलेला दंड व नियम ५० खालील जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क किंवा वसुलीचा खर्च खालीलप्रमाणे माफ करण्यात येईल.

| तपशील | कालावधी | माफी |
|---|---|---|
| दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत असलेल्या मालमत्ता कराच्या थकित रक्कमेसह चालू आर्थिक वर्ष २०२३-२४ चा सुद्धा मालमत्ता कर रक्कम नागपूर महानगर पालिका निधीत जमा केल्यास | दि.०१ जानेवारी, २०२४ ते दि.३१ मार्च, २०२४ च्या सायंकाळी ८.०० वाजेपर्यंत | थकित शास्ती रक्कम व दंड/फी ची रक्कम **८० टक्के** माफ |

**३. 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' चा लाभ खालील बाबीसाठी अनुज्ञेय राहील :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे परिशिष्ट 'ड' प्रकरण ८ चे कराधान नियम ४१ खालील शास्ती/दंड किंवा नियम ५० खालील जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क किंवा वसुलीचा खर्च वा नमुद कालमर्यादेनुसार **८०% माफ** करण्यात येईल.

**४. 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' अंतर्गत सवलतीस पात्र असलेल्या रक्कमा :**

सदर योजना ही वर नमूद केलेल्या कालावधीत जमा केलेल्या रक्कमांनाच लागू राहील. या योजनेच्या प्रारंभापूर्वी अथवा समाप्तीनंतर भरणा केलेल्या रकमांना लागू राहणार नाही. योजना सुरु होण्यापूर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत मागणी/दावा करता येणार नाही.

**५. 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' नुसार करावयाचा भरणा आणि अपील मागे घेणे इत्यादी अभय योजनेच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी लागू असणाऱ्या अटी :**

- ज्या कालावधीसाठी सवलतीचा लाभ घ्यावयाचा आहे, त्या कालावधीचे कोणतेही प्रलंबित असलेले अपील पुनर्निरीक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, मा.न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहिजे.
- जर अभय योजनेचा लाभ मिळाल्यानंतर अपील, पुनर्निरीक्षण आवेदन, संदर्भ आवेदन, मा.न्यायालयात दावा किंवा रिट याचिका दाखल केली तसेच भविष्यात सदहू योजनेतील लाभधारक मालमत्ता कर करीता थकबाकीदार आढळल्यास अभय योजने नुसार संबंधीत कालावधीसाठी दिलेल्या सवलती काढून घेण्यात येतील.
- 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' चा लाभधारक भविष्यात मिळकतकर रकमांकरीता थकीतदार राहणार नाही, असा लिखीत कबुली वचननामा संबंधीत लाभधारकांनी लाभ घेतेवळी सादर करणे गरजेचे राहील.

**६. आयुक्तांचे अधिकार प्रदान करणे :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६९ अन्वये आयुक्तांस असलेले अधिकार कलम १२८ व प्रकरण ८ कराधान नियम मधील नियम ५१ नुसार 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' च्या कालावधीपर्यंत (दिनांक ०१ जानेवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४) या कालावधीसाठी उपायुक्त (महसूल), सहाय्यक आयुक्त (कर), सहाय्यक आयुक्त (झोन) यांना प्रदान करण्यात येत आहेत, त्यानंतर ते संपुष्टात येतील.

तसेच सध्यास्थितीत म.न.पा. सीमेतील ४२६ झोपडपट्टी क्षेत्रातील इमारत व जमिनी करीता आदेश क्र.१४३१/TAD दि.०७/१२/२०२३ अन्वये लागू केलेली अभय योजना 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' मध्ये ०१ जानेवारी २०२४ पासुन समाविष्ठ होईल.

**७. कार्यवाही विषयक बाबी :**

- मालमत्ता कर विभागाने 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' राबविण्यासाठी मागणी नोंदवहीत सदर रक्कमा माफ केल्याची नोंद करदात्याने कराचे संपूर्ण रक्कमेचे अधिदान केल्यानंतरच घ्यावी.
- मे.सायबरटेक सिस्टीम ॲन्ड सॉफ्टवेअर प्रा.लि. यांनी 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' राबविण्यासाठी संगणक प्रणालित (GeoCivic Property Tax Management System) योग्य ते बदल तत्काळ करावयाचे असून माफ करण्यात येणारी दंडाची रक्कम ही करदाता ज्या क्षणास कराचा भरणा करेल त्या क्षणास (Real Time) माफी देणेबाबत बदल करावेत व तसे प्रमाणपत्र/दाखला करदात्यास देण्यात यावा.

**८. 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' ची जाहिरात व प्रसिध्दी** –

'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' राबविण्यासाठी नागरीकांकडून मोठया प्रमाणावर प्रतिसाद मिळावा यासाठी सदर योजनेच्या तपशीलाबाबत पुढीलप्रमाणे विविध माध्यमातून प्रसिध्दी देण्यात येईल.

१. इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे तथा वर्तमानपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात यावी.

२. महापालिकेच्या संकेत स्थळावर देखील सदर योजनेचा तपशील देण्यात यावा.

३. सर्व झोन कार्यालयात, वसुली केंद्रावर, उद्यानात 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' चे फलक लावण्यात यावे.

४. महानगरपालिकेच्या परिवहन विभागाच्या प्रत्येक बसेस वर 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' चे फलक लावण्यात यावे.

५. स्थानिक T.V.Channel व्दारा, रेडीओ स्टेशन व्दारा 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' ची प्रसिध्दी देण्यात यावी.

६. प्रत्येक वार्डातील प्रत्येक गल्लीत ऑटो फिरवून ध्वनीक्षेपणाद्वारे 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' ची प्रसिध्दी देण्यात यावी.

७. सर्व झोन कार्यालयाव्दारे त्यांचे झोन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या मालमत्ताधारकांच्या घरी माहितीपत्रके वाटून 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' ची माहिती देण्यात यावी.

८. Bulk SMS System द्वारे नागरीकांना SMS पाठवून 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' ची माहिती देण्यात यावी.

९. महानगरपालिकेच्या Advertising sites वर Hoardings लावून 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' ची प्रसिध्दी देण्यात यावी.

१०. खाजगी Advertising sites करीता खाजगी एजन्सीला विनंती करुन 'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४' चे Hoardings खाजगी Advertising sites वर लावण्यात यावे.

उपरोक्तप्रमाणे **'मालमत्ता कर अभय योजना २०२३-२४'**राबविण्याबाबतच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.